SHRI GULABRAO ESHWARA KHANDVE EDUCATIONAL FOUNDATION,

# JAGADGURU INTERNATIONAL SCHOOL, LOHEGAON, PUNE

**TERM 1 EXAM (2024-25)**

**Class: X** **Section: A** **Subject: Marathi ( 009 )**

**Date: 20/ 09/2024** **Total Marks: 80**

**Roll No. : ____** **Time: 3 Hours**

**General Instructions :**

i) **The Question Paper consists of Two sections- Reading and Comprehension Literature based questions and Grammar**

ii) **All questions are compulsory.**

iii) **Read the question carefully before attempting it.**

## विभाग अ . गुण ४०

**प्रश्न १अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ५)** **गुण -५**

इंटरनेट अर्थ ला मराठी मध्ये “आंतरजाल” किंवा “महाजाल” असे सुद्धा म्हणतात. इंटरनेट म्हणजे काय तर नेटवर्क चे असे जाळे जे संपूर्ण जगभरात पसरले आहे. इंटरनेटचे हे जाळे जगभरातील सर्व डिजिटल उपकरणांना टॉवर्स आणि कृत्रिम उपग्रहांच्या माध्यमातून वायरलेस कनेक्शन व्दारे एकमेकांना जोडले गेले आहे. जगातील संगणक प्रणालीला जोडण्यासाठी हाय-बँडविड्थ डेटा लाइनचा वापर केला जातो, यामधे इंटरनेटचा समावेश होतो. इंटरनेट या संकल्पनेत आणखी दोन महत्त्वाच्या बाबी म्हणजेच इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर (आय.एस.पी) आणि नेटवर्क सर्व्हिस प्रोव्हायडर (एन.एस.पी). ISP आणि NSP हे दोन्हीही इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर आणि नेटवर्क सर्व्हिस प्रोव्हाईडर ची संक्षिप्त रूपे आहेत. या दोन्हीही बाबी महत्वाच्या आणि मूलभूत सुविधा प्रदान करतात. जेव्हा इंटरनेट वरून एखादी माहिती प्रसारित केली जाते तेव्हा त्यासाठी जी परवानगी लागते ती इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर आणि नेटवर्क सर्व्हिस प्रोव्हायडर द्वारे दिली जाते. आणखी विशेष इंटरनेटचे महत्त्व म्हणजे हे इलेक्ट्रॉनिक कॉमर्स ची संकल्पना प्रदान करते. ज्यामुळे आपणं आपला ऑनलाईन बिझनेस करू शकतो आणि एखादा नवीन उद्योग कसा सुरु करायचा याबद्दल ही बरीचशी माहिती इंटरनेटच्या माध्यमातून मिळते.

i ) इंटरनेटचे जाळे जगभरातील सर्व डिजिटल उपकरणांना कश्याच्या माध्यमातून एकमेकांना जोडले गेले आहे ?
(विद्युत वाहिनी / टॉवर्स आणि कृत्रिम / दूरध्वनी )

ii )इंटरनेट वरून एखादी माहिती प्रसारित केली जाते तेव्हा त्यासाठी जी परवानगी लागते ती कोणा द्वारे दिली जाते ?
( सर्व्हिस प्रोव्हाईडर / नेटवर्क सर्व्हिस प्रोव्हायडर/सर्व्हिस प्रोव्हाईडर आणि नेटवर्क सर्व्हिस प्रोव्हायडर)

iii ) " ISP " पूर्ण वाक्यात लिहा .
(इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर/ नेटवर्क सर्व्हिस प्रोव्हायडर/इंटरनेट प्रोव्हायडर )

iv ) इंटरनेटच्या माध्यमातून आपल्याला कोणती माहिती मिळते ?

v ) इंटरनेट या शब्दाला मराठी मध्ये काय म्हणतात ?

vi) इंटरनेटचा वापर ज्या ज्या क्षेत्रात होतो , अशा कोणत्याही २ क्षेत्रांची नावे लिहा .

vii )इंटरनेटचे होणारे कोणतेही २ फायदे तुमच्या शब्दात लिहा .

**ब ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ५)** **गुण -५**

नदीसंवर्धन हे एक प्रकल्प आहे ज्यामुळे नद्यांच्या जलस्तराची वाढ होईल. या प्रकल्पात नद्यांच्या जलस्तर वाढीसाठी विविध उपाये केले जातात, जसे की जलाशयांची निर्मिती, जलपुरवठा, वायुपुरवठा, वनसंपदा संरक्षण. नदी आपल्याला मिळालेली अमूल्य देणगी आहे. नदीमुळे अनेक संस्कृती जन्माला आल्या आहेत. मानवी जीवन नदीमुळे आपले जीवन सुकर, सुलभ आणि संपन्न झाले आहे. पर्यावरणाचे रक्षण करावयाचे असेल, तर नदीचे अस्तित्व टिकविणे अनिवार्य आहे. त्यासाठी नदीसंवर्धनाची चळवळ लोकसहभागातून करणे महत्वाचे आहे . पुण्यातील नद्यांची ही दयनीय स्थिती सुधारण्यासाठी पुणे पालिकेने नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचं सांगितलं आहे. हा प्रकल्प मुळा-मुठा रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट या नावानेही ओळखला जातो.या प्रकल्पाअंतर्गत नद्यांच्या काठी अर्थपुर्ण सार्वजनिक क्षेत्र निर्माण केलं जाईल असं पुणे पालिकेचं म्हणणं आहे. संपूर्ण पुणे महानगरपालिका क्षेत्रात मुळा, मुठा आणि मुळा-मुठा रिव्हरफ्रंट विकास प्रकल्प राबवला जाणार आहे.या प्रकल्पाचं काम सुरू झालं आहे. या प्रकल्पाचं काम 11 टप्प्यांत होईल. या प्रकल्पासाठी साधारणपणे साडेपाच हजार करोड एवढा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाचा आणखी एक उद्देश असा आहे की पर्यावरणाचे रक्षण करणारी उद्याने, मोकळ्या जागा आणि सार्वजनिक क्षेत्रांची निर्मिती करणेही या प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित आहे.

i ) आपल्याला मिळालेली अमूल्य देणगी कोणती आहे ?
ii ) लोकसहभागातून काय करणे महत्वाचे आहे ?
iii ) नदी पुनरुज्जीवन प्रकल्प हा कोणत्या नावाने ओळखला जातो ?
iv ) नदी पुनरुज्जीवन प्रकल्प किती टप्प्यांत पूर्ण केला जाणार आहे ?
v ) नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा उद्देश काय आहे ?
vi ) या प्रकल्पासाठी साधारणपणे किती खर्च अपेक्षित आहे ?

**व्याकरण -गुण २०**

प्रश्न २. अ ) सूचनेनुसार कृती करा . ( कोणतेही ४ ) गुण ४

i) अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.
अ ) " ज्या दिवशी नाना गेले त्याच दिवशी मी ठरवले.
ब) " माझ्या हातावर चिठ्ठी ठेवून त्याने निरोप दिला.

ii) " शाब्बास ! असेच यश तुला मिळत राहो" ( वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा ).

iii) राज हुशार आहे ----अभ्यास करत नाही ( पण/ अथवा ) . ( योग्य अव्यय निवडून वाक्य पूर्ण करा. )

iv) पशु---- पक्षी आपली संपत्ती आहे. ( व / पण ). ( योग्य अव्यय निवडून वाक्य पूर्ण करा. )

ब) सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही ३) गुण ३
i) " मी पोहायला शिकणार आहे ". ( वाक्यातील काळ ओळखा)
ii) " वंदनाने पत्र वाचले" ( वर्तमान काळ करा )
iii) "मुसळधार पाऊस पडत आहे" ( भूतकाळ करा)
iv) "रीमा सहलीला गेली " ( भविष्य काळ करा)

क) सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही ३) गुण ३

i) अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतो. ( विधानार्थी वाक्य बनवा )

ii) काल रात्री अतिशय उकडले. ( उद्गारार्थी वाक्य करा )

iii) तू ते पुस्तक आणले पाहिजे. ( आज्ञार्थक वाक्य बनवा )

iv) माझे मन क्षणभर बधिर झाले. ( प्रश्नार्थी वाक्य बनवा )

प्रश्न ३. अ) समानार्थी शब्द लिहा. ( कोणतेही २ ) गुण २

i) इभ्रत - ii) प्रचंड- iii) ध्वज

ब) विरुद्धार्थी शब्द लिहा. ( कोणतेही २ ) गुण २

i) धाडसी x ii) मनाई X iii) साम्य x

क) खालील शब्दांचे लिंग बदला व लिहा. ( कोणतेही २ ) गुण २

i) पुरुष - ii) शिक्षक- iii) सासू

ड) खालील शब्दांचे वचन बदला व लिहा. ( कोणतेही २ ) गुण २

i) काटा- ii) आंबा- iii) मासा-

इ ) पुढील तक्ता पूर्ण करा. . ( कोणतेही २ ) गुण २

| सामासिक शब्द | समासाचा विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| --------------------- | माय आणि लेकरे | ------------------------ |
| अंथरूण पांघरूण | ------------------------ | ------------------------ |
| ---------------------- | लहान किंवा मोठे | ------------------------ |

**प्रश्न ४. अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ५ )** गुण -५

आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. आमचं हायस्कूलही गरीब होतं, त्यामुळं उत्तरपत्रिका घरून न्यावी लागायची. त्यावेळी तिची किंमत फक्त तीन पैसे असायची. आपल्याला कदाचित पटणार नाही; पण तेव्हा दर आठवड्याला हे तीन पैसे उभे करताना देखील माझ्या आईच्या डोळ्यांत पाणी उभं राहायचं. आजही हे आठवलं, की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले. पडेल ते काम केले. काँग्रेस हाऊसजवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यानं एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत; पण त्यावेळी तिला सांगण्यात आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं, की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.'

तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच. माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट मी कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र जमवायची आणि त्याच्या वह्या करून द्यायची. अखंड पेन्सिल मला मिळणं अवघड होतं. त्यामुळं जेमतेम हातात धरता येईल अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

याच हायस्कूलमध्ये मला भावे सर भेटले. ते आम्हांला भौतिकशास्त्र शिकवत. विज्ञानातील हा विषय शिकवताना त्यांनी केवळ शास्त्र शिकवलं नाही, तर त्या विषयाची गोडी लावली आणि त्याचबरोबर जीवनाचं फार मोठं तत्त्वज्ञान शिकवलं.

i ) लेखकांना त्यांच्या हायस्कूल मध्ये जीवनाचे तत्वज्ञान शिकवणारे कोण ?
( त्यांची आई / भावे सर / भावे मॅडम )
ii ) उत्तर पत्रिकेची किंमत
( चार पैसे / तीन पैसे / तीन रुपये )
iii ) लेखकांची आई कोठे ताटकळत उभी राहिली होती ?
iv ) लेखकांच्या आईने त्यांच्यासाठी काय ठरवलं होत ?
v ) कोणत्या प्रकारच्या पेन्सिलने लेखकांना लिहावे लागत असे ?
vi ) लेखक गरीब होते हे तुम्हाला कोणत्या परिस्थितीवरून कळते ?

ब ) खालील कविता वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ५ ) गुण -५

दोन दिवस वाट पाहण्यात गेले ; दोन दुःखात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला ; तारे फुलले, रात्र धुंद झाली ;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

हे हात माझे सर्वस्व ; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत ; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले ; दोन दुःखात गेले.

i ) कवीने याचा विचार हरघडी केला . ( भाकरीचा / दुःखाचा / जीवनाचा )
ii ) कवीने चंद्राला कोणाची उपमा दिली आहे ? ( भाताची / भाकरीची / भावनांची )
iii ) झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे शिकले . ( दुःख / जीवन / आयुष्य )
iv ) कवी कोणकोणत्या गोष्टींचा होशोब ठेवतात ?
v ) साहाय्यास धावून येणारे कवीचे मित्र कोण आहे ?
vi ) कवी जगाच्या शाळेत कोण कोणत्या गोष्टी शिकले आहेत ?
vii ) तुमच्या मते कवीचे आयुष्य कसे आहे ?

## विभाग ब –साहित्य गद्य गुण ४०

प्रश्न ५. अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ३) गुण ३
i) " ऊर्जा शक्तीचा जागर " या पाठातील लेखकाच्या गिरगावातल्या शाळेचे नाव काय होते?
ii) पावडे काका रोज किती किलोमीटर कारणे प्रवास करत?
iii) तपोवनातील स्त्रियांना अब्दुल कोणासारखे वाटे ?
iv) पंत कोणती नोकरी करत होते?
v) सभा संमेलने गाजवणारे कवी कोण होते?

ब) रिकाम्या जागा भरा. ( कोणतेही ३) गुण ३

i) मूळ —--------- दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही कलाकृती उत्तम होऊ शकत नाही.
( कथा / निवेदन / आशय )
ii) सुमित —-------- कानपूरला शिकत होता.
( आय आय टी / आय टी आय / आयपीएस )
iii) —--------- सेतुबंधन केलं, पण त्यासाठी अनेकांचा हातभार लावला.
( रामाने/ हनुमाने/ सीतेने)
iv) छे छे वजनाचा मार्ग—----- काट्यातून जातो.
( भलत्याच / नेहमीच्या/ लोखंडी )

क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही १ ) गुण ३

i) " तापाने फणफणलीस आपली धरती " ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा?
ii) " उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक होणे आवश्यक असते" यावरती तुमचे विचार स्पष्ट करा.
iii) "अब्दुल थोर समाजसेवक" या विधानाची सत्यता पटवून द्या.

## पद्य

प्रश्न ६.अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ३) गुण ३

i) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते?
ii) संतवाणी " योगी सर्वकाळ सुखदाता " यात कवीने चिरकाल टिकणारा आनंद कोणता सांगितला आहे?
iii) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?
iv) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी कोणता?

ब ) रिकाम्य जागा भरा. गुण ३

i) तुझ्या शौर्यगाथे पुढे ,त्याची केवढी ची —------
( मान / किंमत / शान )
ii) ----- तयाचा किंक्कर। तेणें रचिले तें आवार ॥
( नामा / ज्ञाना / तुका )
iii) डोळ्यातील —-------ज्योत ज्योत पाजळावी .
( आसवांची / दुःखाची/ आनंदाची)

क) संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा. ( कोणतेही १) गुण ३

i) " अशा असंख्य ज्योतींची तुझ्या मागून राखण
दिन दुबळ्यांचे असे तुला एकच औक्षण "

ii) " दुनियेचा विचार हरघडी केला अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, यात शाळेत शिकलो"

## स्थूलवाचन

ड) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही २) गुण २

i) " जाता अस्ताला "कवितेतील तुम्हाला समजलेली सूर्याची भूमिका स्पष्ट करा.
ii) " बार्क " दोन ते तीन वाक्यात माहिती लिहा.
iii)" प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हे अधिक परिणामकारक असते " स्पष्ट करा

प्रश्न ७.अ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००-२५० शब्दात निबंध लिहा .     गुण ८

*निसर्ग माझा सोबती

निसर्गाचे वर्णन - मनावर होणारा परिणाम - वातावरणातील बदल - उत्साह - पोषक बदल -----

**किंवा**

माझे आवडते पुस्तक

नाव - विषय -विशेष - का आवडते -काय मार्गदर्शन - व्यवहारात उपयोग

ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा . कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा .     गुण ७

* अंतरशालेय क्रीडा स्पर्धा -- धावण्याची स्पर्धा -शाळेतर्फे वरद चा सहभाग -वरद उत्तम धावपट्टू -सराव -उत्तम धावपट्टू अजयशी स्पर्धा - प्रत्यक्ष स्पर्धा -अटीतटीचा सामना -अचानक अजयचा पाय मुरगळणे -स्पर्धा सोडून वरदची त्याच्या मदतीला धावणे -स्पर्धा हरून ही वरदचे कौतुक

**किंवा**

* जंगलातील वृक्ष -पक्षाचे जोडपे -गुण्यागोविंदाने राहणे -हत्तीचा धुमाकूळ -पिल्ले मरण पावणे -पक्षांचा आक्रोश -दुखी -सुतार पक्षाचा सल्ला व प्रेरणा -हत्तीची समजूत -बोध

क) खालील विषयावर पत्र लिहा. ( लिफाफा आवश्यक )     गुण ५

* तुमच्या शाळेत " व्यक्तिमत्त्व विकास " यावर झालेल्या व्याख्याना बद्दल आभार मानणारे पत्र शाळेचा विद्यार्थी या नात्याने शाळेच्या मुख्याध्यापकांस लिहा .

किंवा

* तुमच्या भागात " कलासागर कार्यक्रम " आयोजित करण्यात आला आहे . पण त्यासाठी लागणारे तिकीट समाप्त झाल्यामुळे मुख्य अधिकाऱ्यास त्यांची मागणी करणारे पत्र लिहा .